# घटक ८ = मुलभूत हक्क

घटनेचा भाग ३
कलम १२ ते ३५ } मुलभूत हक्क अमेरिकेकडून.

भाग ३ ला भारताचा मॅग्ना कार्टा म्हणतात.
(मॅग्ना कार्टा - लॅटिन शब्द: अर्थ महान कागद.
मॅग्ना कार्टा लिबर्टेटम १२१५ मध्ये इंग्लंडमध्ये लिहिली व त्यावर राजा
जॉन ~~हक्क~~ पहिल्याची स्वाक्षरी: ही हक्कांची सनद होती.)

कलम १२ ते ३५ पैकी सन १९७८ - ४४ व्या घटना दु. - मालमत्तेचा हक्क मुलभूत हक्कांच्या सुचीतून वगळला.
नंतर तो भाग १२ मधील कलम ३०० ए अंतर्गत - कायदेशीर हक्क.
सध्या मुलभूत हक्क - ०६

## वैशिष्ट्ये:

① काही हक्क फक्त नागरिकांसाठी काही हक्क नागरिक, परदेशी व्यक्ती किंवा निगम-
② अनिर्बंध नसून सशर्त
③ काही हक्क नकारात्मक ⇒ राज्याच्या अधिकारावर निर्बंध.
काही हक्क सकारात्मक ⇒ व्यक्तींना विशेष अधिकार.
④ मुलभूत हक्कांची न्यायालयाकडून अंमलबजावणी - थेट सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते.
⑤ दैवी किंवा अपरिवर्तनीय नसतात.
⑥ कलम २० आणि २१ वगळता राष्ट्रीय आणिबाणीच्या काळात मुलभूत हक्क निलंबित करता येतात.
कलम १९ केवळ परकीय आक्रमण / युद्धामुळे घोषित आणिबाणी काळात निलंबित — ii
सशस्त्र उठाव किंवा अंतर्गत आणिबाणी काळात मुलभूत हक्क निलंबित करता येत नाही.
⑦ कलम ३१ ए, ३१ बी, ३१ सी ने मु. हक्काच्या कार्याची व्याप्ती मर्यादित केली आहे
⑧ संसद — सशस्त्र दल, निमलष्करी दल, पोलीस दल, गुप्त वार्ता विभाग व संबंधित विभागातील सदस्यांचे मुलभूत हक्क मर्यादित किंवा रद्द करू शकते. (कलम ३३)
⑨ लष्करी कायदा काळात मुलभूत हक्कांवर निर्बंध येतात (कलम ३४)
⑩ या संदर्भात कायदे करण्याचा अधिकार संसदेला (कलम ३५)

राज्याची व्याख्या ⇒ कलम १२ मध्ये
① भारत सरकार / संसद
② राज्य सरकारे
③ स्थानिक प्राधिकरणे
④ वैधानिक व अवैधानिक सर्व प्राधिकरणे - जीवन विमा निगम, तेल व नैसर्गिक वायु निगम इ.
⑤ राज्याच्या वतीने कार्य करणारी खाजगी संस्था / संघटना.

कायदा ही संज्ञा → कलम १३
मुलभूत हक्कांशी विसंगत सर्व कायदे अवैध असतील.

Scanned by CamScanner

२०

कायदा ⇒ अर्थ

① संसद/ राज्य विधिमंडळाने केलेले कायदे.
② राष्ट्रपती/ राज्यपाल अध्यादेश
③ आदेश, नियम, अधिनियम.
④ कायदे म्हणून मान्य रूढी /परंपरा.

## समानतेचा हक्क — कलम १४ ते १८

कलम १४ - कायद्यापुढे समानता व कायद्याचे समान संरक्षण :

भारतीय प्रदेशात राज्य कोणत्याही व्यक्तीस कायद्यापुढे समानता आणि कायद्याचे समान संरक्षण नाकारणार नाही. — नकारात्मक

हा हक्क भारतीय नसेच परकीय व्यक्तीस.

कायद्यापुढे समानता ⇒ ब्रिटियांकडून घेतली
⇒ विशेषाधिकार नाहीत
⇒ सर्वांना समान कायदे
⇒ कोणतीही व्यक्ती कायद्यापेक्षा श्रेष्ठ नाही.

कायद्याचे समान संरक्षण ⇒ अमेरिकेकडून
⇒ कर्तव्ये व विशेषाधिकार - समान परिस्थिती समान वागणूक

कायद्याचे राज्य = संकल्पना ब्रिटिश शास्त्रज्ञ ए.व्ही.डायसी यांची

① कायदा मोडल्या शिवाय शिक्षा नाही } भारतीय राज्यघटना हक्काचा स्रोत.
② कायद्यापुढे समानता
③ हक्कांचा उगम घटना नसून घटना हक्कांचा परिणाम X - भारतीय घटनेत नाही

समानतेच्या तत्त्वाला अपवाद :

① राष्ट्रपती आणि राज्यपाल यांना संरक्षण (कलम ३६१)
अ) न्यायालयाला उत्तरदायी नाही
ब) फौजदारी दावा नाही
क) अटक/ तुरुंगवास नाही.

② संसदेच्या /राज्य विधिमंडळाच्या कामकाजामध्ये वृत्तपत्र टीव्ही दूरदर्शन वर प्रसिद्ध केलेल्या सत्या अहवालाबाबत फौजदारी नाही. (३६१ ए)

③ संसदेत केलेल्या वक्तव्य किंवा मतदाना संदर्भात सांसद सदस्यावर खटला दाखल करता येत नाही. (कलम १०५)

④ राज्य विधिमंडळात ———— " ———— विधिमंडळ (१९४)

⑤ परदेशी राजप्रमुख, वकील यांना फौजदारी व नागरी खटल्यापासून संरक्षण.
⑥ संयुक्त राष्ट्रे किंवा संस्थांना —— ॥ ——

कलम १५ – काही कारणावरून भेदभाव करण्यावर बंदी :
केवळ धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मठिकाण या कारणांमुळे राज्य कोणत्याही नागरिकाविरुद्ध भेदभाव करणार नाही. – नकारात्मक
'केवळ' म्हणजे या व्यतिरिक्त कारणामुळे भेदभावास प्रतिबंध नाही.
भेदभाव म्हणजे विरोधी पक्षपात किंवा प्रतिकूल भिन्नत्व.
अ) दुकाने, उपहारगृहे, सार्वजनिक करमणुकीच्या जागा ⟹ राज्याने भेदभाव करण्याविरुद्ध.
ब) सार्व विहिरी, तलाव, स्नानगृहे घाट रस्ते, जागा. ⟹ राज्य व खाजगी व्यक्ती विरुद्ध

भेदभाव न करण्याबद्दल अपवाद
① महिला व बालकांसाठी विशेष तरतुदी.
② मागासवर्गीय, SC/ST साठी —॥—— आरक्षण व शुल्क सवलत.
③ राज्याच्या अनुदान शिक्षणाच्या किंवा खाजगी शै- संस्थेत प्रवेश सवलत.

सन २००५ मध्ये ९३ वी घटनादुरुस्ती – अंमलबजावणी आरक्षण कायदा २००६ (केंद्रिय शैक्ष- संस्था कायदा)
⟹ IIT व IIM सह सर्व शै- संस्थेत OBC — २७% आरक्षण.
⟹ २००८ सर्वोच्च न्यायालयाकडून वैध.
⟹ अंमलबजावणी करताना अत्युत्पन्न (उन्नत) गटाला वगळावे (Creamy layer) न्यायालयाचा आदेश.

⟹ उन्नत गटात मोडणाऱ्या व्यक्ती :
① राष्ट्रपतीपासून महालेखापरिक्षकापर्यंत.
② केंद्रिय/राज्य गट अ व गट ब चे अधिकारी तसेच सार्व किंवा खाजगी क्षेत्रातील समतुल्य पदे.
③ डॉक्टर, वकील, अभियंते, कलाकार, लेखक.
④ अधिक शेतजमीन असणारे शेतकरी.
⑤ ८ लाखांपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या. – १९९३ पासून उन्नत गट वगळण्यास लागू.
१९९३ – मध्ये – १ लाख.
२००४ —॥— २.५ लाख.
२००८ —॥— ४.५ लाख.
२०१३ —॥— ६ लाख.
२०१७ —॥— ८ लाख

कलम १६ – सार्वजनिक नोकऱ्यामध्ये संधीची समानता :
कोणत्याही पदासाठी नोकरी किंवा नियुक्तीच्या बाबतीत सर्व नागरिकांना समान संधी असणे.

Scanned by CamScanner

म्हणजेच नोकरी किंवा पद याबाबत धर्म, पंथ, जात, लिंग, जन्मठिकाण किंवा वास्तव्य यावरून भेदभाव केला जाणार नाही. किंवा अपात्र ठरविले जाणार नाही.

अपवाद :
① सार्वजनिक नोकऱ्यात राज्य/केंद्रशासित प्रदेश/स्थानिक प्राधिकरणे यामध्ये वास्तव्य अट
सार्वजनिक नोकरी कायदा १९५७.
हा कायदा १९७४ मध्ये रद्द -
सध्या फक्त आंध्रप्र. व तेलंगणा मध्ये तरतूद
② मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची तरतूद
③ धार्मिक संस्था किंवा संघटना - मंडळाचा सदस्य विशिष्ट धर्माचीच व्यक्ती.

मंडल आयोग :

कलम ३४० अनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीयांच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी व विकासाच्या योजना सुचविण्यासाठी सन १९७९ - मोरारजी देसाई सरकारने बी.पी.मंडल यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा मागासवर्गीय आयोग. - अहवाल १९८०
(पहिला मागासवर्गीय आयोग १९५३ - काका कालेलकर अध्यक्ष)
अनुसूचित जाती व जमाती तसेच इ.मा.वर्ग यांसाठीचे आरक्षण ५०% च्या पेक्षा अधिक होऊ नये. म्हणून सरकारी नोकऱ्यात इ.मा.व यांना २७% आरक्षण शिफारस. - अंमलबजावणी १९९० - व्ही.पी.सिंग सरकार
(एका वर्षात नोकऱ्यांमध्ये ५०% पेक्षा जास्त आरक्षण हे घटनाबाह्य - सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय १९६३)

१९९२ - मंडल खटला → इंद्र सहानी विरुद्ध भारतीय संघराज्य.
न्यायालयाने नरसिंहराव सरकारने उच्च जातीच्या गरीब घटकांसाठी केलेले १०% आरक्षण रद्द केले. व OBC - २७% आरक्षण वैध.
अटी → ① उच्च उत्पन्न गट वगळण्यात आला.
② नियुक्तीपुरतेच आरक्षण, पदोन्नतीसाठी नाही (सुरुवातीची ५ वर्षे सोडून)
③ एकूण आरक्षण ५०% पेक्षा अधिक नको.
④ पुढे ओढून घेण्याचा नियम वैध (५०% पेक्षा जास्त होणार नाही)

उन्नत गट ठरविण्यासाठी राम नंदन समितीची स्थापना. - १९९३ ला ठरवले.
१९९३ - राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाची स्थापना.
आरक्षणासाठी मागास जाती कोणत्या सूचीत समाविष्ट करायच्या हे आयोग ठरवेल.

Scanned by CamScanner

⇒ पदोन्नती आरक्षणा बाबतच्या निर्णय रद्द करण्यासाठी १९९५ - ७७ वी घ. दु.
राज्यात SC/ST साठी पदोन्नतीत आरक्षण ठेवण्याचा राज्याला अधिकार तरतुद.
कलम १६ त समावेश

⇒ सन २००० साली ८१ घ. दु. पदांच्या अनुशेषाविषयीचा नियम रद्द.
ओढून घेतलेला अनुशेष स्वतंत्र - ५०% मर्यादा लागू नाही.

⇒ ना लागू आरक्षण कायदा १९९४ - ६९% आरक्षण.
१९९४ - ७६ वी घ दु - परिशिष्ट ९.

## अस्पृश्यता निर्मूलन : कलम १७

कलम १७ अन्वये अस्पृश्यतेची प्रथा नष्ट.

सन १९७६ मध्ये अस्पृश्यता (अपराध कायदा) १९५५ मध्ये दुरुस्ती ⟶ नामकरण
नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५.

⇒ अस्पृश्यता ⟹ लोकांवर लादलेला सामाजिक अन्याय.
(व्यक्तीवर टाकलेला सामाजिक बहिष्कार किंवा धार्मिक सेवांतून वगळले जाणे - समाविष्ट नाही)

⇒ अस्पृश्यतेसंबंधी गुन्हा बद्दल ⟶ सहा महिने कारावास / ५०० रु दंड / दोन्ही शिक्षा.

* अस्पृश्यतेचा गुन्हा करणारा संसद किंवा राज्यविधीमंडळाच्या निवडणूकीसाठी अपात्र ठरतो *

अस्पृश्यतेत खालील कृतींचा समावेश

1. उपासनास्थळी (सार्व) प्रवेश नाकारणे.
2. पारंपारिक, धार्मिक, तत्वज्ञानाच्या कारणावरुन अस्पृश्यतेचे समर्थन करणे.
3. दुकाने, उपहारगृहे, सार्व करमणूकीच्या जागा प्रवेश नाकारणे.
4. SC जातीच्या व्यक्तीचा अपमान (अस्पृश्यतेच्या कारणावरुन)
5. रुग्णालय, शै. संस्था, वसतीगृह प्रवेश नाकारणे.
6. माल विकण्यास किंवा सेवा देण्यास नकार देणे.

कलम १७ मील अधिकार खाजगी व्यक्तीविरुद्ध सुद्धा आहे.

## कलम १८ - पदव्या संपुष्टात आणणे :

1. शैक्ष. किंवा लष्करी पदव्या सोडून राज्य पदव्या देणार नाही.
2. भारतीय — परराष्ट्राकडून पदवी स्विकारणार नाही.
3. भारतात लाभाचे पद धारण करणारी किंवा विश्वस्त असलेली व्यक्ती राष्ट्रपतींच्या संमती शिवाय परराष्ट्राकडून कोणतीही पदवी स्विकारणार नाही (भारतीय व परकीय)

महाराजा, राजबहादूर, राय बहादूर, रायसाहेब, दिवाण — संपुष्टात.
भारतरत्न, पद्मविभूषण, पद्मभूषण, पद्मश्री ⟹ वैध - सर्वोच्च न्याया. १९९६
(बालाजी राघवन वि. भारतीय संघराज्य)

* अर्थात संबंधिताच्या नावापूर्वी किंवा नावानंतर ते वापरु नये — नाहीतर गमवावे लागेल.

Scanned by CamScanner

राष्ट्रीय पारितोषिकाची सुरुवात १९५४ मध्ये — १९७७ मध्ये प्रथा बंद — १९८० मध्ये पुन्हा सुरु ⑤

## स्वातंत्र्याचा हक्क : ( कलम १९-२२ ).

**कलम १९ — सहा हक्कांचे संरक्षण .**

① भाषण व अभिव्यक्ती : आपला दृष्टिकोन, मत, विश्वास ⇒ तोंडी, लेखी, मुद्रित, चित्राद्वारे मुक्तपणे मांडता येईल. त्यामध्ये खालील बाबी.

① दृष्टिकोनाचा प्रचार
② मुद्रण / वृत्तपत्र स्वातंत्र्य
③ व्यापारी जाहिरातींचे स्वातंत्र्य
④ दूरध्वनी संभाषणाची नोंद करण्याविरुद्धचा हक्क.
⑤ सरकारी कामकाज माहिती करून घेण्याचा हक्क.
⑥ शांत राहण्याचा हक्क
⑦ निदर्शने व धरणे धरण्याचा हक्क पण संप करण्याचा हक्क नाही.

② शांततापूर्ण / निशस्त्र सभा भरविण्याचा हक्क :

सार्व सभा भरविणे, निदर्शने करणे, मिरवणूक काढणे.
हा हक्क केवळ सार्व भूमीवर. / संप करण्याचा हक्क नाही.

⇒ फौजदारी प्रक्रिया संहिता (१९७३) च्या कलम १४४ नुसार दंडाधिकारी (राज्य) सुरक्षितेच्या कारणावरून सभावर बंधने घालू शकतो.

⇒ भारतीय दंड संहितेच्या कलम १४१ नुसार ५ किंवा त्यापेक्षा जास्त खालील कारणासाठी एकत्र येणे बेकायदेशीर.

① कायद्याला विरोध
② दुसऱ्याच्या मालमत्तेचा बळजबरीने ताबा घेणे.
③ गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन
④ दुसऱ्याला कायदेशीर बेकायदेशीर कृत्य करण्यास भाग पाडणे.
⑤ शासकीय अधिकाऱ्याला धमकावणे.

③ संस्था व संघटना स्थापन करण्याचा हक्क.

⇒ संस्था व संघटना मध्ये राजकीय पक्ष, कंपनी, भागिदारी संस्था, मंडळ, कामगार संघटना व इतर लोकांच्या संस्थांचा समावेश.

⇒ संस्था व संघटना स्थापन न करण्याचा किंवा त्यात सहभागी न होण्याचा नकारात्मक अधिकारसुद्धा अंतर्भूत.

⇒ संस्थांना मान्यता मिळविण्याचा हक्क हा मुलभूत हक्क नाही.

④ भारतीय प्रदेशात संचार करण्याचे स्वातंत्र्य .

प्रत्येक भारतीय नागरिकाला भारताच्या संपूर्ण क्षेत्रात मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य.
अपवाद : अनुसूचित क्षेत्रात प्रवेश बंदी.

Scanned by CamScanner

⑤ भारतात कोठेही वास्तव्य करण्याचा हक्क :

① राहण्याचा हक्क → तात्पुरते } एकमेकांस पूरक.
② स्थायिक होण्याचा हक्क ⇒ कायमस्वरूपी.

⑥ कोणताही उद्योगधंदा करण्याचा हक्क

* कोणताही धंदा, व्यापार, किंवा उद्योग करण्याचे स्वातंत्र्य.
यावर राज्य वाजवी बंधने घालू शकते.
i) राज्य व्यावसायिक किंवा तांत्रिक अटींना निश्चित करू शकते.
ii) राज्य स्वतः चा उद्योग करू शकते/ सेवा देऊ शकते.
( म्हणजेच नागरिकांशी स्पर्धा करू शकते).

* अनैतिक व घातक उद्योगाचा समावेश नाही त्यावर राज्य बंधने घालू शकते.
किंवा परवाने देऊन नियमन करू शकते.

कलम २० : गुन्ह्याबद्दल दोषी ठरविण्या संदर्भातील संरक्षण.

या कलमान्वये नागरीक किंवा परदेशी व्यक्ती किंवा कंपनी किंवा निगम यांसारख्या वैधानिक व्यक्ती असलेल्या आरोपींना मनमानी किंवा अतिरिक्त शिक्षेपासून संरक्षण दिले आहे.

३ तरतुदी ⟶ ① कार्योत्तर कायदा नाही → घटना घडताना लागू असलेल्या कायद्याचा भंग केल्याशिवाय आरोपी समजले जाणार नाही तसेच शिक्षा गुन्हा घडतेवेळी असलेल्या शिक्षेपेक्षा जास्त नाही.

② दुहेरी शिक्षा नाही → एकाच गुन्ह्यासाठी एकापेक्षा अधिक वेळा आरोपी केले जाणार नाही व एकापेक्षा अधिक वेळा शिक्षा दिली जाणार नाही.

③ स्वतः विरुद्ध साक्ष → स्वतः विरुद्ध साक्ष देण्याची सक्ती केली जाणार नाही परंतु ते पुढील बाबींना लागू नाही.
i) वस्तू सादर करण्याची सक्ती
ii) अंगठ्याचा ठसा, सही / रक्ताचा नमुना देण्याची सक्ती
iii) शरीर दाखविण्याची सक्ती
हे संरक्षण फक्त फौजदारी प्रक्रियेसाठी दिवाणी प्रक्रिया ✗

कलम २१ → जीवित आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याचे संरक्षण :

कोणत्याही व्यक्तीचे जीवित किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य कायद्याने घालून दिलेल्या पद्धतीखेरीज हिरावून घेतले जाणार नाही – नागरीक /नागरिकेतर दोहोंसाठी

गोपालन खटला ( गोपालन विरुद्ध मद्रास राज्य सरकार - १९५०).
सर्वोच्च न्याया → हे संरक्षण केवळ मनमानी कार्यकारी कृती.
→ मनमानी वैधानिक कृतीसाठी नाही.

मेनका खटला ( मेनका गांधी विरुद्ध संघराज्य - १९७८)
→ मनमानी कार्यकारी / मनमानी वैधानिक कृती विरुद्ध.
→ जीविताचा अधिकार म्हणजे केवळ प्राणिज व जीवंत राहणे इतकाच मर्यादीत नसून सन्मानाने जगण्याशी संबंधित आहे.

Scanned by CamScanner

कलम २१ मध्ये खालील हक्कांचा समावेश.

1) सन्मानाने जगणे
2) प्रदुषणमुक्त वातावरण
3) उपजीविकेचा हक्क
4) खाजगीपणाचा हक्क
5) निवाऱ्याचा हक्क
6) आरोग्याचा हक्क
7) मोफत शिक्षणाचा हक्क
8) निशुल्क कायदेशीर मदतीचा हक्क
9) एकांतवासाच्या शिक्षेविरुद्धचा हक्क
10) त्वरेने खटला चालविण्याचा हक्क
11) अमानवी वागणूक मिळण्याविरुद्ध
12) परदेशी प्रवास – हक्क
13) वेठबिगार विरुद्ध –"–
14) कोठडीतील छळाविरुद्ध –"–
15) आपत्कालीन वैद्य. सेवा –"–
16) सार्व. फाशीविरुद्ध हक्क
17) माहितीचा –"–
18) दोषी– अपिल करण्याचा –"–
19) सामा. सुरक्षितता / कुटुंब संरक्षण हक्क
20) बाजू ऐकून घेतली जाण्याचा हक्क.

## कलम २१ए :- शिक्षणाचा हक्क

६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची

तरतूद. – प्राथमिक शिक्षण ⟶ मुलभूत हक्क.
उच्च किंवा व्यावसायिक शिक्षण ⟶ नाही.

⇒ २००२ च्या ८६ व्या घ. दु. ही तरतूद समाविष्ट.

⇒ यापूर्वी भाग ४ मधील ४५ कलमात याची तरतूद होती. – आता ४५ कलम ६ वर्षापर्यंतच्या बालकांचे संगोपन व शिक्षण – समावेश.

⇒ ५१ ए मध्ये नवीन मुलभूत कर्तव्याचा समावेश – ६ ते १४ वयोगटातील बालकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणे हे भारतीयांचे कर्तव्य.

⇒ १९९३ – सर्वोच्च न्याया. कलम २१ अंतर्गत प्राथ. शिक्षणाचा हक्क – मुलभूत हक्क

⇒ १ एप्रिल २००९ – शिक्षणाचा हक्क कायदा (RTE) संमत.
१ एप्रिल २०१० – RTE ची अंमलबजावणी

## कलम 22 ⇒ अटक व स्थानबद्धतेविरुद्ध संरक्षण :

स्थानबद्धता प्रकार 2 ⇒ ① शिक्षात्मक स्थानबद्धता – आरोप सिद्ध झाल्यावर शिक्षा म्हणून स्थानबद्ध करणे.
② प्रतिबंधात्मक स्थानबद्धता – आरोप सिद्ध न होता ताब्यात घेणे.

भाग-१ ⇒ फक्त गुन्हेगारी कृत्यांनाच लागू:
⇒ सर्वसाधारण रचनेशी निगडित.
⇒ खालील हक्क : ① अटकेची कारणे स्पष्टपणे सांगितली जाण्याचा हक्क.
② वकीलाशी विचार विनिमय नसेच बाजू मांडण्याचा हक्क.
③ २४ तासात न्यायाधीशासमोर उपस्थित राहण्याचा हक्क.
④ स्थानबद्ध ठेवण्याचा आदेश न दिल्यास २४ तासात सुटकेचा हक्क

हे संरक्षक उपाय परदेशी नागरिक किंवा प्रतिबंधात्मक कायद्यानुसार अटक केलेल्या किंवा स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीला नाही.

Scanned by CamScanner

भाग २ - प्रतिबंधात्मक स्थानबद्धता
नागरिक व परदेशी व्यक्ती दोहोंसाठी.
① सल्लागार मंडळाने कारणे नमूद केल्याशिवाय ३ म. पेक्षा अधिक काळ स्थानबद्ध ठेवता येणार नाही (सल्लागार मंडळ - उच्च न्याया. न्यायाधीश)
② स्थानबद्धतेची कारणे सांगितली पाहिजे.
③ बाजू मांडण्याची संधी.

## कलम २३ व २४ शोषणाविरुद्धचा हक्क

कलम २३ - मानवी व्यापार व सक्तीचे श्रम यांस प्रतिबंध :

→ नागरिक असलेले व नसलेले दोहोंसाठी.
→ केवळ राज्यापासून नाही तर खाजगी व्यक्तींपासूनही संरक्षण.
→ मानवी व्यापार मध्ये. ① पुरुष / महिला / बालके यांचा वस्तूप्रमाणे क्रय-विक्रय.
② वेश्याव्यवसायासह महिला व बालके यांचा अनैतिक व्यापार
③ देवदासी
④ गुलामगिरी.

अशा कारवायांविरुद्ध शिक्षा करण्यासाठी → (अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६

तसेच वेठबिगार पद्धती निर्मूलन कायदा १९७६ - (बिगार - विनावेतन सक्तीचे श्रम)
किमान वेतन कायदा १९४८
कंत्राटी कामगार कायदा १९७०
समान वेतन कायदा १९७६

अपवाद : सार्वजनिक उद्दिष्टासाठी राज्य विनावेतन सैनिकी किंवा सामाजिक सेवा करण्यास सांगू शकते.

कलम २४ → कारखान्यामध्ये मुलांना कामास बंदी :
कारखाने, खाणी, बांधकाम, रेल्वे - धोकादायक - १४ वर्षाखालील मुलांना नेमण्यास घटना कलम २४ अन्वये प्रतिबंध - साधे काम देण्यास कलम २४ प्रतिबंध करीत नाही.

| | |
|---|---|
| बालकामगार (प्रतिबंध आणि नियमन) कायदा | १९८६ |
| बालरोजगार कायदा | १९३८ |
| कारखाना कायदा | १९४८ |
| खाण कायदा | १९५२ |
| व्यापारी जहाज वाहतूक कायदा | १९५८ |
| मळे कामगार कायदा | १९५१ |
| मोटार वाहतूक कामगार कायदा | १९६१ |
| शिकाऊ कामगार कायदा | १९६१ |
| बिडी व सिगार कामगार कायदा | १९६६ |

Scanned by CamScanner

* बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम - २००५ त्याद्वारे.
बाल हक्क संरक्षणासाठी राष्ट्रीय आयोग
बाल हक्क संरक्षणासाठी राज्य आयोग.
* बाल न्यायालये.
* १४ वर्षाखालील मुलाला कामावर ठेवणाऱ्याला स्वतः भरून दंडात्मक कारवाई.

## बालमजुरीवर संपूर्ण बंदी

बालकामगार कायदा १९८६ मध्ये दुरुस्ती -
नाव - बाल व पौगंडावस्थेतील कामगार कायदा १९८६
पूर्वी - १८ धोकादायक उद्योगात व ६५ धोकादायक प्रक्रियेत १४ वर्षाखालील मुलास - बंदी.
। धोकादायक नसलेल्या उद्योग / प्रक्रियेत बंदी नव्हती.
मात्र सुधारित कायद्याने १४ वर्षाखालील मुलांना कोणत्याही प्रकारच्या उद्योगात वा प्रक्रियात कामावर ठेवण्यास बंदी.
१४ ते १८ धोकादायक — बंदी.
गुन्हेगारांना - ६ म. ते २ वर्षे कारावास / २०००० ते ५०,००० दंड किंवा दोन्हीही // पुन्हा गुन्हा केल्यास किमान १ व कमाल ३ वर्षे कारावास

## धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क - कलम २५ ते २८.

कलम २५ - सदसद्विवेक बुद्धीने वागण्याचे आणि धर्माचे पालन, आचरण व प्रचार करण्याचे स्वातंत्र्य.
कलम २५ मध्ये धार्मिक विश्वास व रिती यांचाही समावेश.
हक्क सर्व नागरिक तसेच परकीयांना.
दोन स्पष्टीकरणे ⇒ ① शीख धर्मात - कृपाण बाळगण्यास परवानगी
② हिंदू या संकल्पनेत शीख, जैन आणि बौद्ध यांचाही समावेश.

कलम २६ = धार्मिक व्यवहाराचे व्यवस्थापन करण्याचे स्वातंत्र्य:
① धार्मिक व विश्वस्त संस्था स्थापन करणे
② धार्मिक बाबतीत व्यवहाराचे व्यवस्थापन
③ स्थावर व जंगम मालमत्ता संपादन करणे.

* कलम २५ ⇒ व्यक्तीच्या हक्कांची हमी.
कलम २६ ⇒ धार्मिक संप्रदायाची हक्कांची हमी.

Scanned by CamScanner

कलम २७ : धर्मविकासासाठी कर न देण्याचे स्वातंत्र्य :

- अर्थ: कररूपाने गोळा केलेला सार्वजनिक निधी राज्याने विशिष्ट धर्माच्या विकासासाठी किंवा कामकाजासाठी केला जाणार नाही.

कलम २८ : धार्मिक शिक्षणात सहभागी न होण्याचे स्वातंत्र्य :

- पूर्ण राज्याच्या निधीतून चालविल्या जाणाऱ्या शैक्षणिक संस्थेत धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही.

परंतु धर्मादाय किंवा विश्वस्त संस्थेस ही तरतूद लागू नाही.

⇒ शासनमान्य किंवा अनुदानीत संस्थेत शिक्षण घेणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर तिच्या संमती शिवाय संस्थेत दिल्या जाणाऱ्या धार्मिक शिक्षणात सहभागी होण्याची सक्ती केली जाणार नाही - अल्पवयीन व्यक्तीच्या बाबतीत पालकाची संमती आवश्यक.

① पूर्णतः राज्याच्या संस्था ⟶ धा. शि. पूर्ण बंदी.
② देणगी / विश्वस्थ संस्था ⟶ धा. शि. परवानगी
③ राज्याने मान्यता दिलेल्या संस्था ⟶ स्वेच्छेनुसार परवानगी
④ राज्याकडून साहाय्य मिळणाऱ्या संस्था ⟶ —"—

## सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क कलम-२९

अल्पसंख्यांकाचे हिताचे संरक्षण :

कलम २९ - नागरिकांना आपली विशिष्ट भाषा, लिपी, किंवा संस्कृती यांचे जतन करणे-हक्क. नतेच धर्म वंश, भाषा, जात या कारणावरून राज्याने चालवलेल्या / राज्याचा निधी घेणाऱ्या शैक्ष. संस्थेत प्रवेश नाकारले जाणार नाही.

धार्मिक अल्पसंख्यांक व भाषिक अल्पसंख्यांक दोघांनाही लागू - २९ कलम.
अल्पसंख्यांक व बहुसंख्यांक दोघांचा समावेश. - सर्वोच्च न्याया.

शैक्षणिक संस्थाविषयक अल्पसंख्यांकाचा हक्क :

कलम ३० = भाषिक / धार्मिक अल्पसंख्यांका साठी खालील हक्क :

① निवडीच्या शैक्ष संस्था स्थापन करण्याचा आणि चालवण्याचा हक्क.
② अशा संस्थांचे मालमत्तेचे सक्तीने अधिग्रहण करण्यासाठी राज्याने ठरविलेल्या मोबदल्यामुळे त्यांना हमी दिलेल्या हक्कावर मर्यादा येणार नाही व तो रद्दही होणार नाही.
③ अशा संस्थांना अर्थसहाय्य करताना राज्य भेदभाव करणार नाही.

अल्पसंख्यांकाच्या शैक्ष. संस्थांचे तीन प्रकार :

① राज्याकडून मान्यता व सहाय्य मिळणाऱ्या संस्था.
② मान्यता मिळणाऱ्या पण सहाय्य न घेणाऱ्या संस्था
③ मान्यता व सहाय्य न घेवू इच्छिणाऱ्या

Scanned by CamScanner

४८

## घटनात्मक उपाययोजना होण्याचा हक्क : कलम ३२

कलम ३२ – पीडित नागरिकांचे मुलभूत हक्क लागू करण्याबाबत उपाययोजनांचे हक्क म्हणजे मुलभूत हक्कांचे संरक्षण होणे हाच एक मुलभूत हक्क.

घटनेतील सर्वात महत्त्वाचे कलम :– आंबेडकर

① थेट सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येण्याचा हक्क.

② हक्कांच्या अंमलबजावणीसाठी आदेश देण्याचा सर्वोच्च न्यायालयाला अधिकार

③ सर्वोच्च न्यायालय इतर न्यायालयांना असे आदेश देण्यास अधिकार देवू शकतो (इतर न्यायालयात उच्च न्याया. समावेश नाही. कारण कलम २२६ नुसार उच्च न्यायालयाला हे अधिकार)

④ राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात दाद मागण्याचा अधिकार निलंबित करू शकतो.

⑤ कलम ३२ द्वारा फक्त घटनेने हमी दिलेल्या मुलभूत हक्कांचीच अंमलबजावणी होते.

⑥ या संदर्भात सर्वोच्च न्यायालय हे प्रारंभिक अधिकारक्षेत्र.

⑦ कलम २२६ नुसार थेट उच्च न्यायालयात ही जावू शकतो.

मुलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी सर्वोच्च /उच्च न्यायालय आदेश जारी करते.

प्रकार ① बंदी प्रत्यक्षीकरण (रिट ऑफ हेबिअस कॉर्पस)

अर्थ = शरीर ताब्यात घेणे.

एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला स्थानबद्ध केले असल्यास त्याला न्यायालयात प्रत्यक्ष उपस्थित करा असा न्यायालयाचे स्थानबद्ध करणाऱ्या व्यक्तीला दिलेला आदेश.

हा आदेश शासकीय अधिकारी किंवा खाजगी व्यक्ती दोघांविरुद्धही

खालील बाबतीत दिला जात नाही. ज्यावेळी ① स्थानबद्धता वैध असेल ② कायदेमंडळाच्या किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या अवमाना संबंधी असेल ③ जेव्हा सक्षम न्यायालयाने स्थानबद्ध केले असेल

② परमादेश (रिट ऑफ मॅन्डामस)

अर्थ - आम्ही आज्ञा देतो.

ज्यावेळी शासकीय अधिकारी आपले कर्तव्य बजावण्यास चुकतो किंवा नकार देतो त्यावेळी न्यायालय अशा अधिकाऱ्याला कर्तव्य करण्याचे आदेश देते.

हा आदेश सार्व. संस्था, निगम, क. न्यायालय, न्यायाधिकरण किंवा सरकार यांच्याविरुद्धही देता येतो.

खालील परिस्थितीत परमादेश दिला जात नाही ① खाजगी व्यक्ती / संस्था ② वैधानिक सामर्थ्य नसलेल्या विभागीय सूचनांची अंमलबजावणी करण्यासाठी ③ काम बंधनकारक नसून विवेकाधिकारावर अवलंबून असेल ④ राष्ट्रपती / राज्यपाल

यांच्याविरुद्ध ⑨ उच्च न्याया. मुख्य न्यायाधिशाविरुद्ध.

③ प्रतिषेध : ( रिट ऑफ प्रोहिबिशन )

अर्थ- बंदी घालणे असा आहे.

वरिष्ठ न्यायालयाने आपल्या अधिकारक्षेत्राच्या बाहेर कामकाज करू नये असा संदर्भात कनिष्ठ न्यायालयाला दिलेला आदेश.

फक्त न्यायिक व अर्धन्यायिक अधिकाऱ्या विरुद्ध –

प्रशासकीय अधिकारी, कायदेमंडळ खाजगी व्यक्ती / संस्था विरुद्ध नाही.

④ उत्प्रेक्षण ( रिट ऑफ सर्शिओररी )

अर्थ- प्रमाणित करावे किंवा माहिती घ्यावी.

कनिष्ठ न्याया/ न्यायाधिकरणात प्रलंबित असलेला खटला वरिष्ठ न्याया. कडे वर्ग करण्यासाठी किंवा खटल्यातील त्याचा आदेश रद्द करण्यासाठी वरिष्ठ न्यायालय असा आदेश देते.

प्रतिषेध — केवळ प्रतिबंधात्मक

उत्प्रेक्षण — प्रतिषेध + उपाययोजना.

व्यक्तीच्या हक्कावर परिणाम करणाऱ्या बाबींसाठी हा आदेश प्रशासकीय अधिकाऱ्याविरुद्ध देता येईल → सर्वोच्च न्याया. १९९१

कायदेमंडळ, खाजगी व्यक्ती किंवा संस्था विरुद्ध नाही.

⑤ अधिकारपृच्छा ( रिट ऑफ क्वो वारंटो )

अर्थ- आपण हे कोणत्या अधिकाराने करत आहात.

शासकीय पदाचा अधिकार असल्याचा दावा करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध वैधतेची चौकशी करण्यासाठी न्यायालय असा आदेश काढते.

कायद्याने निर्माण केलेल्या: मूलभूत शासकीय पदाच्या संदर्भातच आदेश.

मंत्रिपदाविरुद्ध किंवा खाजगी पदाविरुद्ध नाही.

## सैन्य दल आणि मुलभुत हक्क:

कलम 33 . सैन्य दले, निमलष्करी दले, पोलीस दले, गुप्तता विभाग व तत्सम दलाच्या सदस्यांचे मुलभूत हक्क सिमित करण्याचा किंवा रद्द करण्याचा संसदेला अधिकार – हा अधिकार राज्य विधिमंडळाला नाही.

अशा परिस्थितीत न्यायालयात आव्हान देता येत नाही.

कलम 33 अंतर्गत कायदे

① सैन्य कायदा १९५० ② नाविक दल कायदा १९५० ③ हवाई दल कायदा १९५०, पोलीस दल कायदा १९६६

## कलम ३४ - लष्करी कायदा आणि मुलभूत हक्क :

भारताच्या कोणत्याही क्षेत्रात लष्करी कायदा लागू असेल तर त्या काळात मुलभूत हक्कावर मर्यादा घालण्याची तरतूद.

हक्कांचे उल्लंघन होणे या कारणावरून संसदेने केलेल्या संरक्षण कायद्याला कोणत्याही न्यायालयात आव्हान देता येत नाही.

**लष्करी कायदा:** जेव्हा सैनिकी अधिकारी सामान्य कायदे सोडून आपल्या नियमानुसार नागरी प्रशासन चालवतात तेव्हा त्याला लष्करी कायदा म्हणतात.

लष्करी कायदा व राष्ट्रीय आणीबाणी फरक :

| लष्करी कायदा | राष्ट्रीय आणीबाणी |
|---|---|
| ① फक्त मुलभूत हक्कावर परिणाम | मुलभूत हक्काबरोबरच केंद्र राज्य संबंधावर परिणाम |
| ② सरकार व सामान्य कायद्याची न्यायालये निलंबित | चालू राहतात. |
| ③ कायदा व सुव्यवस्था कोलमडल्यास लष्करी कायदा लागू करतात. | युद्ध, परकीय आक्रमण, सशस्त्र बंड |
| ④ विशिष्ट क्षेत्रासाठी | संपूर्ण देशात किंवा देशाच्या काही भागात. |
| ⑤ घटनेत तरतूद नाही. | सुस्पष्ट तरतूद आहे. |

## कलम ३५

मुलभूत हक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी कायदे करण्याचा अधिकार संसदेला.

1) वास्तव्याची अट नोकरीसाठी - कलम १६
2) आदेश देण्याचा अधिकार इतर न्यायालयांना - कलम ३२
3) सैन्यदल, पोलीसदल मुलभूत हक्कावर मर्यादा किंवा रद्द - कलम ३३
4) राज्याच्या अधिकार क्षेत्रातील हक्कांच्या संदर्भातील कायदे करण्याचा संसदेला अधिकार

## मालमत्तेचा हक्क :

घटनेतील भाग ३ ⟶ स्थान मुलभूत हक्कांपैकी एक ⟹ कलम १९ (१) एफ व कलम ३१

१९ (१) एफ ⟹ मालमत्ता संपादन, राखणे व विकण्याच्या हक्काची हमी.

३१ ⟹ मालमत्ता हिरावून ~~घेण्याविरोधात~~ घेण्याविरोधी हक्क.

सरकारला दोन परिस्थितीत मालमत्ता हिरावून घेण्याचे अधिकार.

① मालमत्ता अधिग्रहण - सार्वजनिक हितासाठी

② मालमत्ता नुकसान भरपाई

Scanned by CamScanner

मालमत्तेच्या हक्कासंबंधीच्या घ.दु ⇒ १, ४, ७, २५, ३१, ४०, ४२, ४४.

४४वी घदु. १९७८- कलम १९ (१) एफ व ३१ रद्द.

✓ भाग १२ ⟹ कलम ३०० ए चा समावेश

कायद्याच्या अधिकाराशिवाय कोणत्याही व्यक्तीची मालमत्ता हिरावून घेतली जाणार नाही

त्यामुळे तो घटनात्मक/कायदेशीर अधिकार बनला.

**फरक** →

① सामान्य कायद्याने कमी करता येतात तसेच संकोच बदल करता येतो.

② उल्लंघन झाल्यास कलम 32 अंतर्गत दाद मागता येत नाही.
मात्र कलम २२६ नुसार उच्च न्याया. जाता येईल.

③ राज्याने अधिग्रहण केल्यास नुकसान भरपाईची हमी नाही

**कलम ३१ए** –

कलम १४